# धार्मिक क्रांती युगातील स्त्रीयांची अवस्था :एक चिकित्सक अध्ययन

**डॉ. ज्ञानेश्वर शामराव कडव**
इतिहास विभाग प्रमुख
ज. मु. पटेल कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, भंडारा

**सारांश :—**

*काळाच्या ओघात वैदिक धर्मात जे दोष निर्माण झालेत, त्यातून नव्या धार्मिक तत्वज्ञानाची गरज भासू लागली. या गरजेतून जैन व बौध्द तत्वानाचा उदय झाला. त्यांना धर्म म्हणून मान्यता मिळाली. या कारणानेच स्मृति ग्रंथांचीही निर्मिती केल्या गेली. वैदिक धर्माला नवे स्वरूप प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केला गेला. हा बदल धर्मिक क्रांती या नावाने ओळखल्या जातो. धार्मिक क्रांतीच्या या युगात स्त्रीयाची अवस्था काय होती. नव्या तत्वज्ञानात स्त्रीयांना काय स्थान होते याची चिकित्सा करण्याकरिता सदर श्शोध निबंध तयार केला आहे.*

**जैन धर्मात स्त्रीयांचे स्थान :—**

जैन धर्मामध्ये गृहस्थ जीवनापेक्षा ब्रम्हचर्याला अधिक महत्व देण्यात आले आहे.स्वाभविकच स्त्री ही पुरूषांच्या अध:पतनाला कारणीभुत असल्याच्या विविध कथा रचण्यात आल्या आहेत.पण तरीही पुरूषांप्रमाणे स्त्रीयांनाही संन्याशाची परवानगी देण्यात आली आहे. स्त्रीयांना मोक्षाचा अधिकार देण्याच्या बाबतीत मात्र जैन धर्मियांमध्ये मतभेद आहेत.दिगंबर पंथीयांच्या मते स्त्रीला मोक्षाचा अधिकार नाही.ती पुरूष म्हणून पुर्नजन्म मिळाल्यावरच मोक्षाची अधिकारी होते.परंतु श्वेताबंर पंथीयांना मात्र स्त्रीयांना मोक्षाचा अधिकार आहे असे वाटते.[१] श्वेताबंराच्या मते मल्ली ही स्त्री १९ वी तीर्थंकर होती.दिगबंरांना अर्थातच या तीर्थंकराचे अस्तित्व मान्य नाही. ३ वर्ष साधना केलेला श्रावक (पुरूष संन्यासी) हा ३० वर्षे साधना केलेल्या श्रविकेचा गुरू होऊ षकतो. असे हे दोन्ही संप्रदाय मानतात.यावरून जैन धर्मातील स्त्रीचे गौणत्व स्पष्ट होते.[२]

**बौध्द धर्म :—**

बुध्दाचा स्त्री विषयक दृष्टिकोण सुरूवातीला संकुचित होता असे दिसते.पुढे आनंदच्या आग्रहावरून स्त्रीयांना प्रवेश द्यायचे कबुल केले.भिक्षू संघात प्रवेश देतांना व्यक्त केलेला अभिप्राय स्त्रीयांचे गौणत्व दर्शविणारा आहे.माझा धर्म आता एक हजार वर्षाऐवजी ५०० वर्षेच टिकेल. नुकतीच दिक्षा घेतलेला भिक्षूक समोर आला असता शंभर वर्षे वयाच्या भिक्षुणीने आदराने उठून उभे राहीले पाहीजे.ही बौध्द संघातील प्रथा स्त्रीयांचे दुय्यम स्थान दर्शविणारी आहे.[३] संघात स्त्रीयांना प्रवेश देणे, निर्वाणाचा म्हणजेच मोक्षाचा अधिकार मान्य करणे, स्त्री

आणि पुरूषांत कोणताही भेदभाव न करणे,स्त्री शिक्षणाचा पुरस्कार करणे इत्यादी बाबीवरून मर्यादित प्रमाणात का होईना पण स्त्रीच्या स्वतंत्र अस्तित्वाला या धर्माने मान्यता दिलेली दिसते.त्यामुळे या काळात खेमा, उत्तरा, सुफला, चन्ना, उशाली, रेवती, पटाचरा यासारख्या स्त्रियांनी शिक्षण घेऊन स्त्रीच्या उन्नती करीता कार्य केल्याचे दिसून येते.[४] कौटुंबिक जाचातून बाहेर पडण्यासाठी भिक्षुणी बनल्या.'थेरीगाथा' या गंथात अशा ७३ भिक्षुणींनी आपले अनुभव मांडलेले आहेत. बौध्द धर्माच्या उदार वातावरणामुळे हे शक्य झाले होते. पुढे बौध्द धर्माचा ऱ्हास हा स्त्रीच्या प्रगतीपथाचाही ऱ्हास होता.हे उघड आहे.[५]

बुध्दाने जातिसंस्थेचा विरोध केला याचा अर्थ बुध्दपूर्वकाळात जातीयता स्थिर झाली होती असा होतो. बहुजनसमाजाच्या दुःखाला बुध्दाने वाचा फोडली पण वास्तवीक जगात हे ऐहिक दुःख नाहीसे होणे शक्य नव्हते.यामुळे दुःख समुदय आणि दुःख—निरोध यांची बौध्द व्याख्या आत्मगत राहीली आणि दुःख विनाशाचे मार्ग वैयक्तिक सदाचाराचे मार्ग ठरले.स्त्रीयांच्या दुःखाची खरी सामाजिक कारणे व त्यांच्या विनाशाचा सामाजिक मार्ग या दोन्ही गोष्टींचा शोध बुध्दासारख्या श्रेष्ठ विचारकालाही त्यावेळी शक्य नव्हता. कारण सामाजिक विषमता आणि तज्जण्य दुःखे ज्यात दुर होऊ शकतात अशी भौतिक परिस्थितीच त्यावेळी अस्तित्वात नव्हती.पुढे अल्पावधितच तत्कालीन धनिक आणि राज्यकर्त्यांनी बौध्द धर्मावर आपली पकड बसवली.मर्यादित पुनरूज्जीवन करणारे बौध्द संघ देखील या वर्गसमाजाच्या चाकोरीत क्रमशः रूळत गेले. खिस्ती धर्माच्या बाबतीत मूलतः हीच गोष्ट घडली. दलितांच्या उध्दाराची आशा देणारे हे दोन्ही धर्म ती आशा पुर्ण करू शकले नाहीत हे खरे पण गुलामी समाजाचा अंतकाळ समीप आणून नव्या प्रकारच्या वर्गसमाजाची (सरंजामशाही) उभारणी करण्याच्या क्रियेत त्यांनी अवश्य आपला वाटा उचलला.[६]

**स्मृतीकाळ :—**

बौध्द व जैन धर्माच्या उदयामुळे वैदिक धर्माला आलेली मरगळ झटकून टाकून वैदिक धर्माचे पुनरूज्जीवन करण्यासाठी मनुस्मृती, याज्ञवल्कय स्मृती, नारद स्मृती, विष्णू स्मृती इ. स्मृती ग्रंथाची निर्मिती करण्यात आली. सर्व स्मृती ग्रंथात मनुस्मृती हा प्राचीन व महत्वाचा ग्रंथ आहे.या ग्रंथाचा काळ इ.स.पू. २ रे शतक ते इ.स. दुसरे शतक आहे. हिंदू कायद्यावरचा प्राचीन काळातील हा सर्वोत्कृष्ट ग्रंथ होय.यात वर्ण, धर्म, स्त्री स्वातंत्र, विधवांची कर्तव्ये, पति, पत्नीधर्म, व्यभीचार,जातीसंस्थेची निर्मिती, वर्णसंस्कार,नियोगनिती, शेत जमिनी संबंधीचे कायदे, क्रय—विक्रय, दान, करार याचबरोबर दिवाणी व फौजदारी कायद्याची चर्चा केलेली आहे. आजची आपली कायदे पध्दती बव्हंशी याच ग्रंथावर आधारलेली आहे. हे सर्व स्मृतीग्रंथ आर्यांच्या धर्मशास्त्राचे आधारभूत ग्रंथ आहेत. वैदिक समाजाला योग्य स्वरूप देण्याचा सनातनी प्रयत्न स्मृतीग्रंथात केलेला आढळतो. शुक्रनिती नुसार कुळ व जातीचा विचार केवळ विवाह व भोजनाबाबतच करावा असे निर्देशीत करतो.[७]

मनुस्मृती सारख्या ग्रंथाने धार्मीकतेच्या नावाखाली सामाजीक व्यवस्थेच्या संदर्भात केलेले नियम नंतरच्या काळात अधिक प्रभावी झाले. व स्त्रीच्या आर्थिक शोषनाबरोबरच सामाजीक शोषनही या काळात मोठया प्रमाणात सुरू झाले त्याची झळ स्त्रीयांना मोठया प्रमाणात पोहचली. व्यक्ती स्वातंत्र संपूर्णतः कुंठीत झाले, ती बंदीस्त जीवन जगू लागली.[८] प्रत्येक देशाच्या, संस्कृतीची, आचार संहीतेची व नितीमत्तेची अलिखीत बांधणी त्या त्या देशाच्या आर्थिक रचनेवर व जडणघडनेवर आधारभुत असते.प्राचीन कालीन समाजव्यवस्थेचा डोलारा कृषि व्यवसायातील जमीनसबंध आणि जातीवर आधारीत, सामाजिक उतरंडीच्या खांबावर उभा होता.'जात' या शब्दाचा जन्माशी संबंध आहे.आणि जन्म देणाऱ्या स्त्रिया असतात. जननक्षमतेवर पित्यासोबतच तिच्या नवऱ्याच्या कुटुंबाचे नियंत्रण असणे जरूरीचे ठरते.ही व्यवस्था टिकविण्यासाठी स्त्रीयांची दडपणूक व दुय्यमत्व महत्वाचे होते.कारण जातीची शुध्दता दृढ करण्यासाठी लैंगिकतेवर नियंत्रण ठेवणे निकडीचे होते.[९]

जात ही विषमतेचे प्रतिबिंब आहे.[१०] उच्च जातींची ज्ञान, संपत्ती, सत्ता यांच्यावर घट्ट पकड असते.ही पकड तशीच घट्ट रहावी म्हणून त्यांच्यामध्ये जातीच्या षुध्दतेचे महत्व सर्वाधिक असते. जात स्त्रीयांवर लैंगिक नियंत्रण ठेवणारी, त्यांचे दुय्यमत्व अधोरेखीत करणारी, त्यांचे स्वातंत्र्य हिरावून घेणारी व्यवस्था होती व आहे. स्त्रीया पुरूष सत्तेची बंधने झुगारून देऊन व्यभीचारी होतील, आणि पितृत्वाची निश्चिती करता न आल्याने पितृवंशीय वारसापध्दतीला धक्का बसेल तसेच वर्णसंकर होऊन जातीची उतरंड कोसळेल याबद्दल या काळात अतिशय दहशत, धास्ती होती. अशा तऱ्हेने ही व्यवस्था टिकविण्यासाठी स्त्रीयांच्या लैंगिकतेवर नियंत्रण ठेवणे, त्या विवाहामध्ये आपल्याच जातीच्या आणि एकाच पुरूषांशी संबंध ठेवतील याची तजविज करणे निकडीचे होते.हे कार्य स्मृतीकरांनी अनेक स्मृतीचे लिखाण करून केले.[११]

अर्थात आंतरजातीय विवाह आणि एक पतिपत्नीक विवाहाची नियमने तोडून वर्तन करणाऱ्याही स्त्रीया होत्याच, त्यांना अनुलोम/प्रतिलोम स्वरूप देण्यात आले.स्मृतीकारांना जातिबाहय विवाह मान्य नव्हता. वर्णसंकर म्हणजे हाहाःकार हे त्यांचे ठाम मत होते.त्यात अनुलोम विवाहांना काहीतरी क्षमा आहे पण प्रतिलोम विवाहाइतके महाभयंकर पाप नाही.[१२]

ज्यांचयाकडे संपत्ती, सत्ता असते त्यांना शुध्दता राखण्यामध्ये सर्वात जास्त रूची असते.संपत्तीवर अबाधीत मालकी राखण्याकरीता, बालविवाह, नियोगप्रथा, सतीप्रथा, विधवेचे केशवपन, या तिच्या सर्व हालचालींवर कडक नियंण ठेवणे, या समस्येवर स्मृतीकारांनी काढलेमली उत्तरे आहेत. या सर्व उत्तरामध्ये अर्थातच स्त्रीच्या विरूध्द बळाचा वापर केला जातो.

संपत्तीच्या बाबतीत मनूने स्त्रीला गुलामांचा दर्जा दिलेला आहे.स्त्री, पुत्र व गुंलाम यांना मालकी हक्क नसतो. त्यांची सर्व मिळकत त्यांच्या मालकाची ठरते. मनू म्हणतो की, 'बाल्यकाळी स्त्री ने पित्याच्या अधिन,

तरूणपणी पतीच्या अधिन आणि पतीच्या मृत्यु नंतर पुत्राच्या आज्ञेत अधीन होऊन रहावे.[१३]

पितृसत्ता ही कुटुंबापासून सूरू होते. तीचा पाया तसा खाजगी मालकी आणि खाजगी संपत्ती सारख्या सामाजिक संस्थामध्ये आहे. कारण कोणत्याही पुरूषाच्या संपत्तीचा वारसदार त्याचाच मुलगा पाहिजे यासाठी स्त्रीवर पुरूषी सत्तेचे ऐवढे मोठे अवडंबर लादले जाते.[१४]

भारताच्या प्रागेतिहासीक काळापासूनचा इतिहास बघीतला तर कोणत्या स्त्रियांवर केव्हा व कसे नियंत्रण आले हे समजते. आर्य–अनार्य संघर्षानंतर अनार्य स्त्रियांवर पूर्ण नियंत्रण आले. आणि जमिनीवरची खाजगी मालकी आणि जाती व्यवस्था पक्की झाल्यावर आर्य–उच्च जातीय स्त्रीयांवरचे नियंत्रण दृढ झाले. वरच्या जातींच्या पुरूषांना खलच्या जातींच्या स्त्रियांवर हक्क गाजवता येत होता.ज्या पुरूषांकडे सत्ता असते ते सत्तेपासून वंचित असलेल्या या गटातील स्त्रियांवर लैंगिक अत्याचार करणे आपला अधिकार समजतात.

जातीव्यवस्था म्हणजे एक उतरंड असल्यामुळे स्त्रियांवर पुरूषांचे वर्चस्व वेगवेगळया जातीमध्ये वेगवेगळे होते. ते उच्च जातीमध्ये जास्त कडवे आणि जास्त हिंस्त्र होते.इतर जातीमध्ये वर्चस्व असले तरी त्याचे प्रमाण तुलनेने सौम्य होते. स्त्री पुरूषांना एकमेकांबरोबर वावरण्यात खालच्या जातींना मोकळीक होती.खालच्या जातीत स्त्रीयांना मिळालेली स्मृती ग्रंथातील मोकळीक त्यांचे उत्पादन प्रक्रियेतून त्यांचे शोषण करण्यासाठी असते.[१५]

स्त्रीयांवरचे नियंत्रण दृढ करण्याकरीता अनेक स्मृती मधून तसेच जातक–कथा सारख्या कथनात्मक तसेच उपदेशात्मक किंवा नियमनात्मक स्तोत्रांमधून पती किंवा कुटुंबातील पुरूषांनी आणि राजाने स्त्रियांवर विशेषत: उचचजातीय स्त्रीयांवर, नियंत्रण ठेवण्याची गरज पुन्हा पुन्हा ठसवली. अनियंत्रित लैंगिकता, स्वैराचार हा स्त्री स्वभावच आहे असे म्हटले गेले.याउलट स्त्री धर्म म्हणजे पतिव्रताधर्म,पतीशी तो कसाही असला तरी स्वार्थत्याग करून त्याची सर्व सेवा करणे यातच तिच्या जीवनाचे सार्थक आहे. हाच तिचा धर्म, आदर्श आहे असे स्मृती व पुराणांमधून सांगितले गेले.अनेक नीतीपर धडयांमधून, वचनांमधून पतिव्रता धर्माचे उदात्तीकरण केले गेले.१६

स्त्रीयांचा स्वभाव आणि धर्म/कर्त्यव्य यात तफावत असल्याने स्त्रीयांचे स्त्री धर्माप्रमाणे आचारण व्हावे यासाठी स्त्री स्वभावावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे हे स्मृती मधून ठसवले गेले आणि स्त्रीयांवरच्या नियंत्रणाचे समर्थन केले गेले.स्त्रीयांवरच्या नियंत्रणात कळीची भूमिका, पतिव्रता धर्माच्या विचार प्रणालीची होती. पुरूष सत्तेच्या शोषण व्यवस्थेचे अत्युच्च यश या पतिव्रता धर्माच्या विचार प्रणालीत आहे.ज्यामुळे स्त्रीया स्वत:च स्वत:वर नियंत्रण ठेवू लागल्या.एवढेच नव्हे तर पतिव्रता होण्यासाठी असे नियंत्रण ठेवण्यात स्त्रीया भाषण समजू लागल्या. त्यामूळे पुरूषसत्ता नैसर्गीक वाटू लागली.

**निष्कर्ष :—**

अशाप्रकारे धार्मिक क्रांतीचे काळात नवे धार्मिक तत्वज्ञान मांडून समाजासाठी आचरणाची नवी तत्वे पुरस्कृत करण्यात आली.याव्दारे समाजात निर्माण झालेली न्यूनगंडाची, भितीची, अपराधीपणाची भावना दूर करण्याचा, मानवी जीवनातील दु:खांचे कारण शोधून त्यावर उपाय सूचविण्याचे कार्य जैन, बौध्द धर्माने तसेच स्मृती ग्रंथाव्दारे करण्यात आले.समाजाला नवी संजिवनी यामूळे प्राप्त झाली पण स्त्रीयांच्या बाबतीत मात्र परंपरागत दृष्टीकोनाचाच स्विकार त्यांनी केला. या दृष्टीकोनात परिस्थितीनुसार बौध्द धर्माने बदल केला व धर्मप्रसाराच्या कार्यात स्त्रीयांना समावून घेतले असले तरी त्यामुळे समाजातील बहुसंख्य स्त्रीयांच्या स्थितीत, दर्जा व त्याच्या प्रतिच्या दृष्टीकोनात विशेष बदल घडून आला नाही.इतर धर्मापेक्षा बौध्द धर्म स्त्रीयांचे बाबतीत अधिक पुरोगामी असल्याचे दिसून येते.

कदाचित त्यावेळी जैन व बौध्द धर्माला किंवा स्मृतीकारांना स्त्रीयांबाबतीतला परंपरागत दृष्टीकोनाविरूध्द भूमीका घेतल्यास जनसमर्थन प्राप्त होण्याची शाश्वती वाटली नसावी.धर्म तत्वज्ञानाचा प्रचार व प्रसार करण्यासाठी तशी भूमीका घेणे त्यांना हितावह वाटले नसावे. मुख्य म्हणजे स्त्रीयांची स्थिती किंवा समाजाचा स्त्रीप्रतिचा दृष्टीकोन या नव्या तत्वज्ञान निर्मीती चे कारण ठरले नव्हते.पण या भूमीकेमूळे स्त्रीयांवरील बंधने उत्तरोत्तर अधिक कड्क झालीत. स्त्री कर्तृत्वाला वाव राहिला नाही. समाजाची व देशाची अर्धिशक्ती व्यर्थ गेली.भविष्याच्यादृष्टीने ही भूमिका हानीकारक ठरली.भारत पाश्चिमात्य राष्ट्राच्या तुलनेत सर्वच क्षेत्रात अप्रगत व मागासलेला राहिला, यासाठी ही बाबही कारणीभूत ठरली असे म्हणणे अतिशयोक्तीचे ठरणार नाही. हे प्रतिबिंबीत करण्यासाठी सदर शोध निबंध सादर आहे.

**<u>संदर्भ ग्रंथ सूची</u> :—**


१) र. ना. गायधीनी — प्राचीन भारतीय स्त्री जीवन — यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक, २००७, पृ. ४५

२) आ. ह साळुंखे — हिंदु संस्कृती आणि स्त्री — लोकवाड्:मय गृह, मुंबई, २००१, पृ. १६८

३) कित्ता — पूर्वउल्लेखित, पृ. १६८

४) बी. एन. लुणीया — भरत का राजनितीक एवं सांस्कृतीक इतिहास, आगरा, १९६९, पृ. १७७

५) यशवंत मनोहर — भगवान बौध्द आणि त्यांचा धम्म — सारतत्व, प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर, पृ. ११७

६) ग. श्री. सरदेसाई — भरतीय तत्वज्ञान : दु.आ. लोक वाड्:मय गृह,

मुंबई, १९९७, पृ. ११३

७) ब्रम्हाष्शंकर मिश्रा – षुक्रनीती, वाराणसी, १९६८, पृ. ४२

८) प्रदिप महाले – स्त्री व कायदा, पृ. ८२

९) अनघा तांबे – भारताचा इतिहास, नवी आव्हाने आणि नव्या दिशा, प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००६, पृ. ६८, ६९.

१०) अमर्त्य सेन – भारतीय अर्थतंत्र इतिहास और संस्कृती, दिल्ली, २००५, पृ. ४४

११) वंदना सोनाळकर, शार्मिला रेगे – पितृसत्ता व स्त्री मूक्ती, क्रांतीसिंह नाना पाटील अकादमी, अहमदनगर, २००७, पृत्र ६, ७.

१२) प्रदिप गोखले – स्त्रि–पूरूष विषमता व मनुस्मृती, असिमता दर्शन प्रकाशन, १९६१, पृ. ६६

१३) आ. ह. सांळुखे – पूर्वउल्लेखित, पृ. २१३

१४) वंदना सोनाळकर – पूर्वउल्लेखित, पृ. ७

१५) नर्बदेश्वर प्रसाद – जातिव्यवस्था, राजकमल प्रकाशन, दिल्ली, १९६५, पृ. १३०, पृ. १३४.

१६) आ. ह. सांळुखे – मनुस्मृतीच्या समर्थकांची संस्कृती–लोकवाङ्मय गृह, मुंबई, २०००, पृ. २१३.